# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१२/२०२४

| | |
|---|---|
| श्री. सदानंद सटूप्पा कांबळे<br>मु.काळमवाडी,पो.सांबरे,ता.गडहिंग्लज<br>जि.कोल्हापूर ४१६५०४ | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर<br>२. सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | वि. प |

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. सदानंद सटूप्पा कांबळे यांनी दिनांक १७/१०/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमुद तक्रार पुढीलप्रमाणे-

**तक्रारीचे स्वरूप :**

१. सेवाअंतर्गत कालबध्द पदोन्नतीसाठी विहित वेतनश्रेणी व तदअनुषंगिक लाभ मिळावेत.
२. सातव्या वेतन आयोगानुसार स्थाननिश्चिती करून वेतन व वेतन फरकाची रक्कम मिळावी.
३. सेवा कालावधीतील परिनियमानुसार/शासनमान्य सेवाशर्तीच्या नियमानुसार बढती आणि सेवा जेष्ठतेनुसार कनिष्ठ लिपिकाचे वेतन व वेतन फरकाचा लाभ मिळावा.
४. नोव्हेंबर, डिसेंबर १९९८ आणि जानेवारी, फेब्रुवारी १९९९ या चार महिन्यांचे विनाकारण रोखलेले वेतन मिळावे.
५. सेवापुस्तकातील अनियमित नोंदीची दुरूस्ती करून सेवाजेष्ठतेचे लाभ व दुबार सेवापुस्तक मिळावे.
६. पी.एफ च्या कपात केलेल्या रक्कमेच्या पावत्या मिळाव्यात.

तक्रारदार यांनी उपरोक्त तक्रारी अर्जात नमूद करून त्याबाबत विस्तृत माहिती अर्जासोबत दिली आहे. ती खाली समितीच्या निरिक्षणामध्ये नमूद करण्यात आली आहे.

संस्था महाविद्यालयाचा अभिप्राय :

संस्था व महाविद्यालयाने सदर तक्रारीबाबत आपला मुद्येनिहाय अभिप्राय सादर केलेला असून तो समितीच्या निरिक्षणामध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

समितीची निरिक्षणे :

१) तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मुद्या कं. १ मध्ये कालबध्द पदोन्नतीसाठी लागू होणारा कार्यकाल १२/१० वर्षानंतरचा दि. ०१/०७/१९९३ पासून ते दि. ०१/०७/२००५ ला कालबध्द वेतनश्रेणीचा लाभ अद्याप मला मिळाला नाहीत ते मिळावे तसेच नवीन जीआर प्रमाणे कालबध्द पदोन्नतीसाठी लागू होणारा कार्यकाल १० वर्षानंतरचा दि. ०१/०७/१९९३ पासून ते २००३ पर्यंत होत आहे. सदर कालावधीनुसार कालबध्द वेतनश्रेणीचा लाभ अद्याप मला मिळालेला नाही तो मिळावा. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कालबध्द पदोन्नती (वरीष्ठ वेतनश्रेणी) चा लाभ देण्यात आला आहे. परंतु माझी वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. सदरच्या सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत सोबत जीआर जोडलेला आहे, तरी सर्व बाबींचा विचार होवून मला मिळणारा लाभ व फरक रक्कम मिळावेत अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये सदर कर्मचाऱ्याची प्रथम नियुक्ती ही दि.०१/०७/१९९३ ची शिपाई या पदावर करण्यात आलेली होती. सदर कर्मचाऱ्याला कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ दि.०१/०७/२००५ रोजी लागू होतो. परंतु सदर कर्मचाऱ्यास हा लाभ घेणेसाठी लागणा-या कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत महाविद्यालयाने दि.०६/०४/२०१० रोजी पत्र दिले. त्याची पूर्तता आजअखेर कर्मचाऱ्याने न केलेने सदर लाभ देता आला नाही असे नमूद केले आहे.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे अवलोकनी घेता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी दि.३१/०७/२००७,दि.१६/०३/२००९,दि.१७/०२/२०१२, दि.२८/१०/२०२३,दि.१३/०१/२०२४ इत्यादी रोजीच्या पत्रांनी कालबध्द पदोन्नती मिळणेबाबत वेळोवळी जाबदार यांचेकडे पत्रव्यवहार केलेचे दिसून येते. तक्रारदार हे दि.०१/०७/१९९३ या नियुक्ती दिनांकापासून ते दि.०१/०७/२००५ पर्यंतच्या १२ वर्षाच्या कालबध्द पदोन्नतीस पात्र ठरतात याबाबत उभय पक्षकारांच्या कोणतेही मतभेत नाहीत. तथापि, कालबध्द पदोन्नतीकरिता लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत दि.०६/०४/२०१० रोजीच्या पत्राने तक्रारदार यांना कळवूनही त्यांनी ती आजअखेर दिली नाहीत त्यामुळे तक्रारदार यांना १२ वर्षाचा कालबध्द पदोन्नतीचा लाभ देता आलेला नाही असे जाबदार यांनी लेखी खुलाश्यात म्हटले आहे. जाबदार यांचे दि.०६/०४/२०१० रोजीचे तक्रारदार यांना पाठविलेले पत्र

अवलोकनी घेता त्यामधील कागदपत्रांची यादीमधील बंदपत्र वगळता सर्वच कागदपत्रे जाबदार संस्थेकडील असल्याचे दिसून येते. संस्थेकडील कागदपत्रे महाविद्यालयास मागविणे हे केंव्हाही सोपे असते. सदर पत्रावर तक्रारदार यांची पोहोच दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे पत्र तक्रारदार यांना मिळाले आहे किंवा कसे याबाबतची स्पष्टताही होत नाही. तसेच या अनुषंगाने तक्रारदार यांना पुन्हा अवगत करण्यात आल्याचेही दिसून येत नाही. सबब, समितीच्या निरिक्षणानुसार जी कागदपत्रे संस्थेच्या ताब्यातच आहेत, त्याची पुर्तता, तक्रारदाराकडून करण्याची अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे.

तसेच तक्रारदार यांनी २४ वर्षाच्या कालबध्द पदोन्नती (वरीष्ठ वेतनश्रेणी) मिळावी अशी मागणी केली आहे. सदर मागणीबाबत जाबदार यांनी आपले कोणतेही लेखी, तोंडी म्हणणे समितीसमोर सादर केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार हे २४ वर्षाच्या कालबध्द पदोन्नती (वरीष्ठ वेतनश्रेणी) साठी पात्र होतात असे दिसून येते. सबब, तक्रारदार यांना देय ठरणा-या तारखेपासून २४ वर्षाच्या कालबध्द पदोन्नती (वरीष्ठ वेतनश्रेणी) लाभ जाबदार यांनी देणे आवश्यक आहे. त्यास असणारी विहित कार्यवाही जाबदार यांनी तात्काळ करणे आवश्यक आहे. तसेच यासाठी जाबदार यांना आवश्यक असणारी तक्रारदार यांच्याकडील कागदपत्रे तक्रारदार यांनी त्वरीत जाबदार यांचेकडे सादर करावीत.

तक्रारदार यांनी सदर तक्रारीत नविन शासन निर्णय प्रमाणे कालबध्द पदोन्नतीसाठी लागू होणारा कार्यकाल १० वर्षानंतरचा असून त्याप्रमाणे दि.०१/०७/१९९३ पासून ते २००३ पर्यंत होत असून त्याप्रमाणे लाभ मिळावा अशी मागणी केली आहे. याबाबत समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी दाखल केलेला दि.०२ मार्च २०१९ रोजीचा शासन निर्णय अद्याप विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी यांना अद्याप लागू नसल्याचे निदर्शनास येते. सबब, सातव्या वेतन आयोगामधील तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेनुसार लाभ मिळावे ही मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

२) तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मुद्‌दा क्र. २ मध्ये सातव्या वेतन आयोगानुसार स्थाननिश्चिती करून वेतन व वेतन फरकाची रक्कम मिळावी अशी मागणी केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये - सदर कर्मचाऱ्याचा शिपाई पदावरील सातव्या वेतन आयोगाचा वेतननिश्चिती फॉर्म दि.०९/१०/२०१९ रोजी महाविद्यालयातील इतर सर्व सेवकांसोबतच तयार करणेत आला होता. सदर फॉर्मसोबतच्या विकल्पावर व वचनपत्रावर श्री. कांबळे यांनी सहया करणेस स्पष्ट नकार दिला. त्यामुळे मा.प्रशासन अधिकारी, मा. विभागीय सहसंचालक कार्यालय कोल्हापूर यांनी त्यांच्या सातव्या वेतन आयोगाचा प्रस्ताव नाकारलेला आहे असे नमूद केले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, जाबदार यांनी तक्रारदार यांना सन २०१२ मध्ये कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती दिलेचे दिसून येते. तथापि त्यांची पदोन्नतीची वेतननिश्चितीची कार्यवाही जाबदार यांनी पुर्ण करून घेतलेली नसल्याचे दिसून येते. संस्था, महाविद्यालातील कर्मचा-यांचे प्रस्ताव परिपुर्णरित्या संबधित कार्यालयास पाठविणे ही जबाबदारी संस्था व महाविद्यालय यांचीच आहे. तक्रारदार यांचे कथनानुसार जे प्रस्ताव पाठविले त्यावर त्यांच्या सहया घेतलेल्या नाहीत. तक्रारदार यांचे सातव्या वेतन आयोगाचे प्रस्ताव हे संबधित शासकीय कार्यालयास परिपुर्णरित्या पाठविण्यात आलेले नाहीत असे दिसून येते. सबब, समिती या निष्कर्शाप्रत येते की, जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या सातव्या वेतन आयोगाबाबत परिपुर्ण प्रस्ताव तयार करून त्यावर तक्रारदार यांची सही घेवून प्रस्ताव संबधित शासकीय कार्यालयास पाठवावा. त्यास तक्रारदार यांनी पडताळणी करून प्रस्ताव सादर करणेस सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यानुसार जाबदार यांनी कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे.

३) तक्रारदार यांनी सेवा कालावधीतील परिनियमानुसार/शासनमान्य सेवा ज्येष्ठतेनुसार शर्तीच्या नियमानुसार बढती आणि कनिष्ठ लिपीक बढतीचे वेतन व वेतन फरकाची रक्कमेचे लाभ मिळावेत अशी मागणी नमूद केली आहे. तसेच याबाबत दिलेल्या विस्तृत माहितीमध्ये मा. संस्थेने कनिष्ठ लिपीक पदाची बढती जावक क्र. ०९/२१/२०१२-१३/दि. ०१/०९/२०१२ रोजीच्या आदेशपत्राने (ऑर्डर) दिले आहे. परंतु अद्याप पर्यंत त्या पदाचे सेवाज्येष्ठतेप्रमाणे बढती व वेतन मिळत नाही, आजही शिपाई पदाचेच वेतन मिळते. सेवापुस्तकामध्ये कनिष्ठ लिपीक पदाची नोंद करून दुबार (डयुप्लीकेट) सेवा पुस्तक मिळावे. सेवाज्येष्ठता बढती व कनिष्ठ लिपिक पदाचे सर्व लाभानुसार वेतन व वेतन फरकाची रक्कम मिळावेत अशा तक्रारी मांडल्या आहेत.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांना संस्थेने दि. ०१/०९/२०१२ रोजी कनिष्ठ लिपीक पदी पदोन्नतीची ऑर्डर दिलेली आहे. यावेळी त्यांचेकडे प्राचार्यांनी विद्यार्थी प्रवेश व परीक्षेसंबंधीची कामे दिलेली होती. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून गोळा केलेल्या रक्कम रू. १,८०,९१६/- इतक्या रक्कमेचा भरणा केलेला दिसून येत नव्हता. याबाबतचा स्पष्ट उल्लेख लेखापरीक्षण अहवालात दिसून येतो. तरीही महाविद्यालयाने श्री. कांबळे यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव दि.२९/०७/२०१५ रोजी मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे सादर केलेला आहे. मा. विभागीय सहसंचालक यांनी काही त्रुटींसह सदर प्रस्ताव दि. २३/०६/२०१६ रोजीच्या पत्राने परत पाठवला. त्यानंतर महाविद्यालयाने पुन्हा एकदा सदर पत्रातील उल्लेखीत त्रुटीपूर्तता करून दि. १२/०६/२०१८ रोजी पदोन्नतीचा फेरप्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तरीदेखील सदर कार्यालयाच्या दि. ०१/०७/२०१८ रोजीच्या पत्राने पुन्हा त्रुटी दाखवून प्रस्ताव परत आला. या पत्रातील त्रुटी या कर्मचाऱ्याने पूर्तता करणे आवश्यक आहे.

त्रुटींच्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याने आपली कागदपत्रे कार्यालयात जमा करणे अनिवार्य आहे. सदरचे पत्राची झेरॉक्स प्रत श्री. कांबळे यांनी स्विकारली मात्र मूळ पत्रावर पोहोच देणेस नकार दिला. सबब आजअखेर सदरच्या त्रुटींच्या कागदपत्रांची पूर्तता कर्मचाऱ्याने न केल्याने त्यांच्या पदोन्नतीस शासनमान्यता अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना कनिष्ठ लिपीकचे वेतन व वेतन फरकाचे लाभ आजही देता आलेले नाहीत. तसेच त्रुटी पूर्तता करणेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे जमा करणेसंबंधी श्री. कांबळे यांना वारंवार प्रत्यक्ष व पोस्टाने पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु त्यांनी सदरची पत्रे स्विकारलेली नाहीत. त्यांनी अस्विकृत झालेली पत्रे आजही महाविद्यालय कार्यालयात जमा आहेत.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीच्या असे निदर्शनास येते की, तक्रारदार यांनी त्यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत त्यांच्या आधी दुसऱ्या कर्मचाऱ्यांना बढती दिलेली आहे, परंतु याबाबत त्यांनी समितीसमोर सेवाज्येष्ठता यादी किंवा त्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ कोणताही ठोस पुरावा दिलेला नाही. सबब तक्रारदार यांची सेवाज्येष्ठता बढतीबाबतची मागणी मान्य करता येणार नाही. जाबदार यांनी तक्रारदार यांना सन २०१२ मध्ये क.लिपिक या पदावर पदोन्नती दिली आहे. याबाबत पदोन्नतीची वेतननिश्चिती करणेबाबत जाबदार यांनी विभागीय सहसंचालक कार्यालयास पाठविलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने विभागीय सहसंचालक कार्यालयाने महाविद्यालयास कळविलेल्या पत्रांचे अवलोकन केल्यास दि.१२ जुन २०१८ रोजीच्या पत्रामधील अधिकतर कागदपत्रे ही महाविद्यालयाच्या अखत्यारीतील असून वेतननिश्चिती करून घेण्याची सर्व जबाबदारी जाबदार यांचीच असून त्याची पुर्तता करणे आवश्यक आहे. तसेच दि.०१ जुलै २०१८ रोजीच्या पत्रामधील अ.क्र. शैक्षणिक अर्हततेबाबत कागदपत्रांची पुर्तता करणे तक्रारदार यांची जबाबदारी आहे. तसेच वेतनबॅन्ड बदलाची मान्यता घेणे ही महाविद्यालयाची सर्वस्वी जबाबदारी आहे. तसेच गोपनिय अहवाल महाविद्यालयाकडेच उपलब्ध असतात. सबब, संस्था, महाविद्यालय यांनी या त्रुटींची पुर्तता करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीकरिता तक्रारदार यांनीही आवश्यक ते सहकार्य करणे गरजेचे आहे.

सबब, समिती या निष्कर्षाप्रत येते की, जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांची पदोन्नतीची वेतननिश्चितीबाबत परिपुर्ण प्रस्ताव तयार करून संबधित कार्यालयास तात्काळ पाठवून तक्रारदार यांना त्यांचे पात्र दिनांकापासून लाभ देण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच या कामी तक्रारदार यांनी जाबदार यांना आवश्यक त्या त्रुटीपुर्ततेबाबत सहकार्य करावे. तसेच जाबदार यांनी तक्रारदार यांच्या सेवापुस्तकामध्ये अद्ययावत नोंदी करून त्याची एक दुबार प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करून देणे नियमानुसार आवश्यक आहे.

४) तक्रादार यांनी नोव्हेंबर, डिसेंबर १९९८ ते जानेवारी, फेब्रुवारी १९९९ या चार महिन्यांचे विनाकरण रोखलेले वेतन मिळावे, कोणतेही कारण नसताना व कोणतीही समज नसताना चार महिन्यांचे वेतन रोखलेले असून आजपर्यंत मिळालेले नाही, रोखलेल्या चार महिन्याचे वेतन मिळण्यासाठी वरीष्ठांकडे तोंडी व लेखी मागणी करूनदेखील कोणतेही पत्रव्यवहार नाही किंवा वेतन माझे बँक खाते जमा केलेले नाही, तरी सदरची वेतन रक्कम मिळालेली नसल्याचे नमूद केले आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये तत्कालीन प्र.प्राचार्य श्री. एम.डी. माने यांनी कार्यभार नसलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन केले कारणाने महाविद्यालयातील सर्वच कर्मचाऱ्यांचा माहे नोव्हें. १९९८ ते फेब्रु. १९९९ वेतन झालेले नव्हते. तदूनंतर प्र.प्राचार्यांच्या वेतनातून कपात करून सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या वरील कालावधीतील वेतनाच्या ३७ टक्के रक्कम दि. २७/०३/२०२४ रोजी अदा केली आहे. श्री. माने यांनी तक्रार निवारण समितीकडे अर्ज करून आपल्या वेतन कपातीस स्थगिती मिळविल्या कारणाने उर्वरीत ६३ टक्के रक्कम सर्वच कर्मचाऱ्यांना अद्यापही अदा करता आलेली नाही असे म्हटले आहे.

जाबदार यांनी सादर केलेला खुलासा अवलोकनी घेता, तक्रारदार यांचे नोव्हेंबर, डिसेंबर १९९८ ते जानेवारी, फेब्रुवारी १९९९ या चार महिन्यांचे रोखलेले वेतन हे विनाकारण रोखलेचे दिसून येते. सदर वेतन रोखणेबाबत तक्रारदार यांना याबाबत कोणतेही म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे असे दिसून येत नाही. तसेच सदर रोखलेले वेतन हे कायद्याच्या तरतूदीनुसार रोखलेले आहे असे ही दिसून येत नाही. तक्रारदार हे सदर कालावधीत महाविद्यालयात कार्यरत होते ही बाब जाबदार यांनी अमान्य केलेली नाही. सबब, जाबदार संस्था व महाविद्यालय हे तक्रारदार यांचे वेतन विनाकारण रोखू शकत नाही. तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे वेतन देणे ही जाबदार यांची जबाबदारी आहे.

५) तक्रादार यांनी तक्रारी अर्जामध्ये वेतनश्रेणी टप्पापूर्ण झालेनंतर वेतनामध्ये समाधानकारक वेतनश्रेणी दिलेली नाही. तरी सुधारीत वेतनश्रेणी द्यावीत व याची दुरूस्ती करून मिळावी. सेवापुस्तक पूर्ण नसल्याचे संलग्नता कमिटीच्या निदर्शनास आलेनंतर महाविद्यालयाच्या अटी पूर्ततेमध्ये नोंद झालेली होती व अट काढून टाकण्यासाठी माझे कडून जबरदस्तीने लिहून घेण्यात आले. तसेच दुबार प्रत भरून देतो असे सांगून सेवाबुक घेतले व अद्यापी सेवाबुक मला दिलेले नाही, ते सर्व नोंदी करून मिळावे. सेवा पुस्तकातील अनियमित नोंदीची दुरूस्ती करून सेवाज्येष्ठतेनुसार नोंदी होवून मिळावे अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये महाविद्यालयातील सर्वच कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत नोंदीसह ठेवणेत आलेली आहेत. श्री.कांबळे यांच्या सेवापुस्तकात कोणत्याही प्रकारची

अनियमित नोंद केलेली नाही. तसेच श्री. कांबळे यांनी सन २०१४ पासून सेवापुस्तकामध्ये स्वतःच्या सहया केलेल्या नव्हत्या. त्यामुळे त्या-त्यावेळी प्राचार्यांनी देखील त्यांच्या सेवापुस्तकावर सहया केलेल्या नाहीत. नियमित प्राचार्य दि. २९/०२/२०२४ रोजी सेवानिवृत्त झालेनंतर दि. ०९/०५/२०२४ रोजी विद्यापीठ संलग्नीकरण समिती अध्यक्ष डॉ. एस.बी.भांबर यांचे सांगणेवरून त्यांनी आपल्या सेवापुस्तकावर सहया केलेल्या आहेत. परंतु त्यावेळचे नियमित प्राचार्य हे त्याआधीच सेवानिवृत्त झालेने सेवापुस्तकावर प्राचार्यांच्या सहया नाहीत.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, शिवाजी विद्यापीठ परिनियमानुसार संस्था/महाविद्यालयाकडील कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्ययावत नोंदीसह ठेवणे ही जबाबदारी संस्था, महाविद्यालय यांचीच असते. त्यानुसार जाबदार यांनी तक्रारदार यांना त्यांचे सेवापुस्तक अद्यायावत नोंदी करून त्याची दुबार प्रत तात्काळ उपलब्ध करून देणे कायद्याने बंधनकारक आहे.

६) तक्रारदार यांनी नेमणूकीपासून आजपर्यंत कपात केलेल्या पीएफ च्या रक्कमा दरमहा वेतनातून व फरकाच्या रक्कमा पीएफ साठी कपात केलेल्या आहेत. परंतु कपात केलेल्या रक्कमेच्या पावत्या दिलेल्या नाही, तरी सदरच्या पावत्या मला मिळाव्यात अशी मागणी केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये सर्वच कर्मचाऱ्यांना सन २०१३-१४ पर्यंतच्या पीएफ कपातींच्या पावत्या मा. विभागीय सहसंचालक यांच्या सहीने दिलेल्या आहेत. सन २०१४-१५ पासून सन २०१७-१८ पर्यंतची पीएफ ची हिशेबपत्रके पूर्ण करून पीएफ पावत्या तयार करून मा. विभागीय सहसंचालक यांच्या सहीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यावर सहया झालेल्या नाहीत. तसेच सन २०१७-१८ ते २०२३-२४ पर्यंतची सर्व पीएफ खात्यांची हिशेबपत्रके कार्यालयीन पूर्ण केलेली आहेत. त्यांची अंतिम तपासणी सदर कार्यालयाकडून होणे बाकी आहे. विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या तपासणी वेळापत्रकानुसार अंतिम तपासणी पूर्ण झालेनंतर पीएफच्या सहया झालेल्या पावत्या महाविद्यालयास मिळताच सर्व कर्मचाऱ्यांना वितरीत केल्या जातील असे लेखी व समितीसमोर कथन केले आहे.

सदर तक्रारीबाबत समितीचे मत असे की, जाबदार यांनी विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या तपासणी वेळापत्रकानुसार अंतिम तपासणी पूर्ण झालेनंतर पीएफच्या सहया झालेल्या पावत्या महाविद्यालयास मिळताच सर्व कर्मचाऱ्यांना वितरीत केल्या जातील असे समितीसमोर कथन केले आहे. त्यास अनुसरून जाबदार यांनी सत्वर या पावत्या उपलब्ध करून कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक आहे. समिती खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुतची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या १२ व २४ वर्षाच्या कालबध्द पदोन्नतीबाबत त्यांना देय तारखेपासून फरकासह लाभ देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करून त्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव सदर आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत संबधित कार्यालयास पाठवून देण्याची कार्यवाही करावी.

२. जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या पदोन्नतीच्या वेतननिश्चितीबाबत तसेच सातव्या वेतन आयोगाबाबतच्या प्रस्तावांबाबत त्यांना देय तारखेपासून फरकासह लाभ देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करून त्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव सदर आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत संबधित कार्यालयास पाठवून देण्याची कार्यवाही करावी.

३. जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांचे सन नोव्हेंबर, डिसेंबर १९९८ आणि जानेवारी, फेब्रुवारी १९९९ या चार महिन्यांचे रोखलेले वेतन त्यांना सदर आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत आदा करावे.

४. जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांचे सेवापुस्तकातील अनियमित नोंदीची दुरूस्ती करून अद्यायावत कलेल्या नोंदीसह त्याची दुबार प्रत तक्रारदार यांना सदर आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत उपलब्ध करून द्यावी.

५. जाबदार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या पीएफच्या कपातीच्या पावत्या संबधित शासन कार्यालयाकडून प्राप्त करून तक्रारदार यांना द्याव्यात.

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

दिनांक : 29 JUL 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)